ग्रामपंचायत अधिकारी या संवर्गातून
विस्तार अधिकारी (पंचायत) या संवर्गात पदोन्नती
देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
आदेश क्रमांक :-साप्रवि-२/ग्राप-२/४०७ /२०२६
दिनांक:- ०६/१० /२०२६

संदर्भ :-१. महा.जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील परिशिष्ट ८(२)
२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१८/प्र.क्र.१५९/का-१२ दि.०१/०८/२०१९
३. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्रमांक बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७ मे २०२१
४. महाराष्ट्र शासन ग्रामपंचायत विभागाकडील शासन निर्णय क्रमांक:- संकीर्ण २०१९/प्र.क्र.७९६/आस्था-७ दि.२४/०९/२०२४
५. पदोन्नती निवड समिती जि.प.अहिल्यानगर यांचेकडील मंजुर इतिवृत्त दिनांक ०५/१०/२०२६

## आ दे श

या जिल्हा परिषदे अंतर्गत सध्या कार्यरत असणा-या खालील ग्रामपंचायत अधिकारी (गट-क) यांना विस्तार अधिकारी (पंचायत) (गट-क) या पदावर संदर्भ क्र.५ अन्वये दि.०५/१०/२०२६ रोजी झालेल्या पदोन्नती निवड समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तातील निवडसुचीनुसार वेतनस्तर एस-१४ (रु.३८६०० ते १२२८००) या मध्ये त्यांच्या नावासमोर रकाना नं. ५ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी खालील अटी व शर्तीचा अधीन राहून तात्पुरती पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे. पदोन्नतीने दिलेली पदस्थापना हि संदर्भ क्र.३ मध्ये दिलेल्या सुचनेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार भरण्यात येत आहेत.

| अ.क्र. | नाव | सध्याचे कार्यालय | निवडीचा प्रवर्ग | दिलेली पदस्थापना |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. क्षिरसागर बाळु बागाजी | पं.स. संगमनेर | जेष्ठतेनुसार | पं.स. अकोले |
| २. | श्री. महांडुळे ज्ञानेश्वर लक्ष्मण | पं.स. श्रीगोंदा | जेष्ठतेनुसार | पं.स. श्रीगोंदा |
| ३. | श्री. राऊत रामचंद्र विठ्ठल | पं.स. राहुरी | जेष्ठतेनुसार | पं.स. पाथर्डी |
| ४. | श्री. गिते राजू कारभारी | पं.स. संगमनेर | जेष्ठतेनुसार | पं.स. राहाता |
| ५. | श्री. तरटे कैलास आबासाहेब | पं.स. कर्जत | जेष्ठतेनुसार | पं.स. कर्जत |
| ६. | श्री. पाटील विजय शिवाजी | पं.स. कोपरगाव | जेष्ठतेनुसार | पं.स. जामखेड |

अटी व शर्ती:-

१. सदरची पदोन्नती ही मा. सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या न्यायालयीन निर्णयांच्या अधिन राहुन निव्वळ तातपुरती स्वरुपात पदोन्नती देणेत येत आहे.

२. सदर पदोन्नती ही तात्पुरत्या स्वरुपाची असल्यामुळे पदोन्नतीच्या दिनांकापासून सेवाज्येष्ठतेचा हक्क सांगता येणार नाही.

३. शासन निर्णय दिनांक ०१/०४/२०१०, दिनांक ०२/०३/२०१९ व शासन परिपत्रक दिनांक २८/०७/२०१४ मधील तरतुदींनुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पहिला/दुसरा/तिसरा लाभ मंजूर केलेल्या कर्मचाऱ्यांनी सदर पदोन्नती नाकारल्यास त्यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल.

४. नेमणूकीचे ठिकाणी विहित कालावधीत हजर न झाल्यास तसेच नेमणूकीचे पदस्थापनेत बदल करणेसाठी कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ मधील नियम ४ नुसार कारवाई करणेत येईल.

५. संबधीत कार्यालय प्रमुखांनी कर्मचा-यास पदोन्नतीने नियुक्तीचे ठिकाणी हजर होणेसाठी पर्यायी स्थानिक व्यवस्था करुन तात्काळ कार्यमुक्त करावे. कार्यालयाची निकड विचारात घेऊन पदोन्नती देण्यात आलेली असल्याने १५ दिवसाचे आत पदोन्नतीच्या ठिकाणी हजर व्हावे अन्यथा सेवा जेष्ठता डावलली जाईल.

६. सदरच्या आदेशाची नोंद संबंधिताच्या मूळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक 20261006060189 असा आहे.

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

उक्त नमूद आदेशातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती संबंधित

द्वारा - गट विकास अधिकारी पंचायत समिती संबंधित

प्रत - माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

१. गट विकास अधिकारी पंचायत समिती अकोले, नेवासा, श्रीगोंदा, पाथर्डी, राहाता, कर्जत, जामखेड
२/- संबधित कर्मचारी हजर होताच हजर अहवाल ग्रामपंचायत विभागात त्वरीत सादर करावा.

२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर

२. कार्यासन-ग्रामपंचायत -१ (ग्रामपंचायत अधिकारी आस्थापना)